27

(९६०)

क्र./ना.भू.१/का.वि./पत्ते संकलित करणे/१९

जमाबंदी आयुक्त आणि संचालक

भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचे कार्यालय

पुणे दि. १३/०५/२०१९

परिपत्रक

विषय :- फेरफार व मोजणी कामासाठी प्राप्त झालेले अर्जदार यांचे पत्ते कार्यालयीन नोंदवहीत नमुद करणेबाबत.

महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ कलम १३६ नुसार मोजणी काम केले जाते. त्यानुसार सर्व हितसंबंधितांना कळविणे आवश्यक असते. तसेच महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ कलम १५० नुसार हक्काचे हस्तांतरण नोंदीसाठी अर्ज प्राप्त होतात. त्यावेळी सर्व संबंधितांना नोटीसा पाठविणे आवश्यक असते. मिळकत पत्रिका/अधिकार अभिलेख पहाता त्यावर केवळ धारकांचे नांव नमुद असून धारक यांचे पत्ते एकत्रित रित्या कुठेही संकलित केले जात नाही. त्यामुळे भविष्यातील फेरफाराबाबत/मोजणी बाबत लगत कब्जेदार यांना नोटीस देताना चालू अर्जदार यांनी पुरविलेल्या पत्यावर अवलंवून रहावे लागते काही अर्जदार जाणिव पूर्वक अपूर्ण /चुकीचे पत्ते नमुद करतात. त्यामुळे हितसंबंधित व्यक्तींना नोटीसा बजावण्यात अडचणी येतात. तसेच वेळेवर नोटीस न मिळाल्याने हरकत घेण्याची संधी निघून जाते. त्यामुळे व्यक्तिच्या हितसंबंधाना बाध निर्माण होते. ही बाब विचारात घेवून कार्यालयात फेरफार /मोजणीसाठी अर्ज आलेनंतर अर्जदार यांचा वाजवी व योग्य पत्ता हा नमुद करून घेवून तो 'पत्ता नोंदवहीत' संधारीत करणेत यावा. त्याचा वापर आवश्यक त्या नोटीस देणेसाठी कार्यालयीन कामाचे वेळी करणेत यावा.

e-PCIS या संगणक प्रणालित अशाप्रकारे पत्ता नोंदवही तयार होणेकरीता ऑनलाईन फेरफाराचे वेळेस पत्ते नमुद करून घेणेची सुविधा संगणक प्रणालित उपलब्ध करून देणेबाबत योग्य ती उपाययोजना करण्यात येत आहे. मात्र ही सुविधा प्रत्यक्षात कार्यान्वित होईपर्यंत प्रत्येक कार्यालयाने फेरफार/मोजणीसाठी आलेला अर्जावरून अर्जदार यांचे वाजवी पत्ते नोंदवहीत नमुद करण्याबाबत तात्काळ कार्यवाही करणेची आहे. पत्ता नोंदवहीचा नमुना पुढीलप्रमाणे आहे.

पत्ता नोंदवही

| अर्जदार यांना नोटीस देणेसाठी प्राप्त नावे | पत्ता | दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल |
|---|---|---|---|

सदर परिपत्रकाची अंमलबजावणी तात्काळ करणेची आहे.

सही XXX

(एस. चोक्कलिंगम्)

जमाबंदी आयुक्त आणि संचालक

भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे

निर्गमित

(किशोर तवरेज) १३.५.१९

उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न

जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन) पुणे

प्रारूप परिपत्रक

प्रतः- सर्व उपसंचालक भूमि अभिलेख यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
प्रतः- सर्व जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
प्रतः- सर्व कार्यालय प्रमुख यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

निर्गमित

13.4.18

(किशोर तवरेज)
उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न
जमावंदी आयुक्त (नागरी भूमापन) पुणे

प्रारुप परिपत्रक